CNR NO - MHAH190015212024

**नियमित दिवाणी दावा क्र.४३०/२०२४**

अलका रमेश बोर्डे

वि.

अशोक शंकर गजभिव व इतर

## <u>अर्ज निशाणी क्र.१५ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.०१ ने त्याचे विरुध्द झालेला दाव्यामध्ये विना कैफियत (No W.S.) प्रकरण चालविण्याचा आदेश रद्द होणेसाठी/बाजुला करण्यासाठी (Set aside) दाखल केलेला आहे. त्यावर वादी तर्फे लेखी खुलासा मागविण्यात आला.

०२. सदर प्रतिवादीचे कथनांनुसार, त्याने दाव्याचे कामी हजर होऊन कैफियत देणे आवश्यक होते. परंतु, सदर प्रतिवादीस कोर्टामध्ये मिळकती बाबत दावे झालेले आहेत, त्या नकला प्रतिवादीस उशिरा मिळाल्या तसेच अन्य आवश्यक कागदपत्रे उशिराने मिळाले. त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही व त्यांचे विरुध्द म्हणणे नाही चा आदेश पारीत झाला आहे. सदर आदेश रद्द करुन कैफियत दाखल करुन घेणेची विनंती प्रतिवादी क्र.०१ ने केली आहे व निशाणी क्र.१६ वर शपथपत्र दाखल केले आहे.

०३. वादीने सदरच्या अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल केले व आक्षेप घेतला की, प्रतिवादीने दिलेल्या अर्जातील कथने संयुक्तिक नाहीत. तसेच प्रतिवादीने जाणिवपूर्वक कैफियत देण्यास उशिर केला व टाळाटाक केली आहे. त्यावरुन सदरचा नामंजूर करण्यावी विनंती वादीने केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रस्तुतच्या दाव्यामध्ये प्रतिवादी हे दिनांक २४/०६/२०२५ रोजी दाव्यात हजर झाले. प्रतिवादींना समन्स प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत लेखी कैफियत दाखल करणे आवश्यक होते. परंतु, त्यांनी मुदतीत त्यांची लेखी कैफियत दाखल केली नाही. तथापि, प्रतिवादीस नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन बचावाची संधी देणे गरजेचे आहे. एकंदरीत सदर अर्जात नमूद केलेले कारण व कायदेशीर बाब विचारात घेता भविष्यातील दाव्यांची बहुविधता टाळण्यासाठी प्रतिवादीवर खर्च लादुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. प्रतिवादीचा अर्ज निशाणी क्र.१५ वादीस एकुण रक्कम रु.३००/–(अक्षरी रुपये तीनशे मात्र) खर्च देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेश खुल्या न्यायालयात देण्यात आला.

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2026.07.21 17:38:55 +0530

(वैशाली सं. मोरे)
दि.२१/०७/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगाव.